# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०७/०३/२०१७

## नक्षली विचारवंत प्रा. साईबाबासह पाच जणांना आजन्म कारावास, एकाला १० वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी ५०००/- रू. दंडाची शिक्षा

- **जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. सुर्यकांत शिंदे यांचा निकाल**

नक्षलवादयांशी संबंध असल्याप्रकरणी गडचिरोली जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. सुर्यकांत शिंदे यांनी प्रा. जी. एन. साईबाबा, प्रशांत राही, हेम मिश्रा, महेश तिरकी, विजय तिरकी, पांडू नरोटे यांना दोषी ठरविले आहे. प्रा. जी. एन. साईबाबा, प्रशांत राही, हेम मिश्रा, महेश तिरकी, पांडू नरोटे यांना न्यायालयाने जन्मठेप व प्रत्येकी ५०००/- रू. दंड व विजय तिरकी याला १० वर्ष सश्रम कारावास व ५०००/- रू. दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

देशविघातक कृत्य, बंदी असलेल्या संघटनाचा सदस्य असणे, त्यांचा प्रचार करणे हया गुन्हयांमध्ये वरील सर्व आरोपींना दोषी ठरविण्यात आले आहे. आरोपींविरूध्द बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायदयाच्या कलम १३, १८, २०, ३८, ३९ व १२० (ब) भादंवि अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता. दिनांक २२/०८/२०१३ रोजी हेम मिश्रा, महेश तिरकी व पांडू नरोटे हे तिघे नक्षल वरीष्ठ कॅडरला भेटण्याकरीता जात असल्याची गोपनिय माहिती होती. तेव्हा मौजा अहेरी येथील बस स्टॉप जवळील परीसरात हेम मिश्रा, महेश तिरकी व पांडू नरोटे हे तिघे संशयीतरीत्या मिळून आले होते. त्यावेळी त्यांच्या जवळून नक्षल पत्रक तसेच नक्षल संबंधीत माहिती असलेले मेमरी कार्ड मिळून आले होते. त्यानंतर या तिघांची आणखी सखोल चौकशी केली असता आरोपी विजय तिरकी, प्रशांत राही व प्रा. साईबाबा हे सुध्दा सदर प्रकरणामध्ये सहभागी असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना गडचिरोली पोलीसांनी अटक केली. अटक केल्यानंतर प्रा. साईबाबा यांच्या घरुन नक्षली विचारांचे साहीत्य मिळून आले. सदर प्रकणाचा तपास तत्कालीन मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सुहास बावचे व

रमेश धुमाळ यांनी पुर्ण करुन मा. प्रमूख जिल्हा व सत्र न्यायालय गडचिरोली येथे दाखल केले. प्रकरणाची न्यायालयीन सुनावणी दरम्यान सदर आरोपींवर गुन्हा सिध्द झाल्याने आज दिनांक ०७/०३/२०१७ रोजी मा. न्यायालयाने ६ आरोपींना दोषी ठरवून पैकी ५ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा व एका आरोपीस १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

सदर प्रकरणात विशेष सरकारी वकील श्री. सत्यनाथन, श्रीमती मिनाक्षी तसेच कोर्ट पैरवी अधिकारी पोउपनि श्री. जयेश खंदरकर, पोउपनि श्री. नितीन शिंदे, पोहवा/शंकर चौधरी, नापोशि/महेश आकुलवार, अरविंद पेंदाम, मनापोशि/जिजा कुसनाके, मपोशि/मोहिनी धुर्वे यांनी काम पाहिले.






